**<u>नियमित दिवाणी दावा क्र.१४२/२०२१ मधील अर्ज नि.क्र.२४ वरील आदेश</u>**
**<u>(श्री. दिलीप दादू कांबळे वि. सावित्रीबाई गुलाब कांबळे वगैरे)</u>**

**CNRMHSN06000927-2021**

१. प्रस्तुतचा अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.३ यांनी त्यांची कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होऊन त्यांची कैफियत अभिलेखावर विनंती केली आहे. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्र.३ यांच्या अर्जामधील कथन असे की, प्रस्तुत दावा दाखल केल्यानंतर दाव्याचे समन्स प्रतिवादी यांना लागू होऊन ते याकामी हजर झालेले आहेत. तथापि, सदरचे संबंधित अधिकारी हे कोव्हीड–१९ या महामारीच्या नियोजनात व अन्य प्रशासकीय कामकाजात व्यस्त असल्यामुळे वकीलांना माहिती देऊन मुदतीत त्यांची कैफियत दाखल करु शकले नाहीत. सबब, त्यांनी त्यांची कैफियत दाखल करुन घेण्याची विनंती केलेली आहे.

३. वादी यांनी नि.क्र.२५ कडे सदर अर्जास त्यांचे म्हणणे दाखल करून जोरदार विरोध दर्शविलेला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादीने अर्जात नमुद केलेली कथने खोटी, चुकीची व बेकायदेशीर असून प्रतिवादी क्र.३ यांना दावेचे समन्स दि.२७/१०/२०२१ रोजी बजावणी होऊन देखील व ते वकिलांमार्फत हजर होऊनही त्यांनी त्यांची कैफियत व म्हणणे मुदतीत दाखल केलेले नाही. सदरील कृत्य हे प्रतिवादीने वेळकाढूपणा व दावा प्रलंबित ठेवण्याच्या उददेशाने केल्याचे दिसते. तसेच सदर अर्जावर प्रतिवादी क्र.३ यांची सही दिसून येत नसल्यामुळे अर्ज संशयास्पद वाटतो. तसेच संबंधित अधिकारी कोणत्या प्रशासकीय कामकाजात व कोव्हीड–१९ च्या कामात किती कालावधीकरिता व्यस्त होते याबाबतची कोणतीही कागदपत्रे न्यायालयात सादर केलेली नाहीत. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा. यदाकदाचित न्यायालय अर्ज मंजूर करणेच्या निर्णयापर्यंत आलेस प्रतिवादी क्र. ३ यांना जास्तीत जास्त कॉस्ट व्हावी अशी विनंती वादीने केली आहे.

४. अर्जामधील कथने प्रतिवादी क्र.३ यांनी शपथेवर सांगितलेली आहेत. प्रतिवादीस दाव्यास कैफियत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. सदरचा विलंब

हा संबंधित अधिकारी हे कोव्हीड–१९ या महामारीच्या नियोजनात व अन्य प्रशासकीय कामकाजात व्यस्त असल्यामुळे झाल्याचे कथन मोघम स्वरुपाचे व दिशाभूल करणारे आहे. दावा हा कायम व कारक ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादीची कैफियत व म्हणणे रेकॉर्डवर आलेस न्यायदानास मदत होणार असल्यामुळे प्रतिवादीला त्याची कैफियत दाखल करणेची व जाबजबाब देणेची संधी मिळणे आवश्यक आहे. परंतु प्रतिवादी क्र.३ यांनी त्यांची कैफियत ही उशिराने दाखल केली असल्याने दाव्याचे कामकाज लांबणीवर पडल्याने सदरचा अर्ज खर्च म्हणून वादीला देण्याच्या अटीवर मंजूर करणे योग्य वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

अर्ज रक्कम रुपये २००/– (र.रु. दोनशे मात्र) खर्च म्हणून वादीला देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

SWATI BHASKAR NAIKNAVARE GARAD

Digitally signed by SWATI BHASKAR NAIKNAVARE GARAD
Date: 2022.07.21 11:15:56 +0530

मिरज. **( स्वाती भा. नाईकनवरे–गरड )**

दि. २०/०७/२०२२ २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | Sou. A.C. Patil, Grade-3 |
| Court. | : | 2nd Jt. Civil Judge,Jr.Dn.,Miraj |
| Date. | : | 20.07.2022. |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 20.07.2022. |
| Order uploaded on. | : | 21.07.2022. |